पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

पुणे महानगरपालिका
सभेचा वृत्तांत ( सभा क्रमांक १७ )
मंगळवार, दिनांक २९/७/२०२५, दुपारी ४.०० वाजता

**पुणे महानगरपालिकेची विशेष (खास) सभा (माहे जूलै २०२५ च्या कार्यपत्रिकेवरील पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल सन २०२४-२०२५ चे कामकाजासाठी प्रथम दिनांक २९/७/२०२५ रोजी बोलविलेली) महानगरपालिकेच्या मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयात भरली होती.**

**सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. नवल किशोर राम, भा.प्र.से. | - | प्रशासक तथा महापालिका आयुक्त |
| २) | मा. पृथ्वीराज बी.पी., भा.प्र.से. | - | अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) |
| ३) | मा. एम.जे.प्रदीप चंद्रन, भा.प्र.से. | - | अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) |
| ४) | मा. ओमप्रकाश दिवटे, भा.प्र.से. | - | अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) |
| ५) | मा. प्रशांत वाघमारे | - | शहर अभियंता |
| ६) | मा. डॉ.निना बोराडे | - | आरोग्य प्रमुख |
| ७) | मा. उल्का कळसकर | - | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ८) | मा. ॲड. निशा चव्हाण | - | मुख्य विधी अधिकारी |
| ९) | मा. संदिप कदम | - | उपायुक्त, (घनकचरा व्यवस्थापन) |
| १०) | मा. संतोष वारुळे | - | उपायुक्त (पर्यावरण विभाग) |
| ११) | मा. नंदकिशोर जगताप | - | मुख्य अभियंता (पाणी पुरवठा) |
| १२) | मा. जगदीश खानोरे | - | मुख्य अभियंता (मलनिःसारण) |
| १३) | मा. मंगेश दिघे | - | Ex. पर्यावरण अधिकारी |
| १४) | श्रीमती योगिता भोसले | - | नगरसचिव |

**तसेच विविध वृत्तपत्रे, चॅनेल, ईलेक्ट्रॉनिक मिडीया इत्यादींचे प्रतिनिधी-पत्रकार सभेला हजर होते.**

**मा. नवल किशोर राम, भा.प्र.से., प्रशासक तथा महापालिका आयुक्त हे अध्यक्षस्थानी होते.**

**नगरसचिव :** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील नियम क्र. १ (एच) अन्वये आजची खाससभा बोलविण्यात आलेली आहे.

**विषय क्र. १६१**

**संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पर्यावरण/३६९, दि. २३/७/२०२५ चे पत्र.**

---

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ मधील कलम ६७ (अ) अन्वये पुणे शहराचा सन २०२४-२०२५ चा पर्यावरण सद्यःस्थिती दर्शक अहवाल.**

**नगरसचिव :** माझी मा.उपायुक्त (पर्यावरण विभाग) यांना विनंती आहे की, त्यांनी पर्यावरण अहवाल मा.प्रशासक तथा महापालिका आयुक्त यांचेकडे सादर करावा.

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ मधील कलम ६७ (अ) अन्वये पुणे शहराचा सन २०२४-२०२५ चा पर्यावरण सद्यःस्थिती दर्शक अहवाल सभागृहात सादर करण्यात आला.)

**मा.संतोष वारुळे, उपायुक्त (पर्यावरण) :** मा.प्रशासक, पुणे महानगरपालिकेने तयार केलेला पुणे शहराचा सन २०२४-२०२५ चा पर्यावरण सद्यःस्थिती दर्शक अहवाल आज आपण सादर करीत आहोत. पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल हा महाराष्ट्र शासनाच्या **'माझी वसुंधरा अभियाना'च्या** 'पृथ्वी', 'जल', 'वायू', 'अग्नी' व 'आकाश' या पंचमहाभूतांवर आधारित असून, पुणे महानगरपालिकेचे विविध विभाग यांचेमार्फत पर्यावरण संरक्षणासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना याबाबतची सविस्तर माहिती यामध्ये देण्यात आलेली आहे. सदर अहवालाबाबत थोडक्यात टिपणी सभागृहापुढे सादर करीत आहे.

# पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल २०२४-२५

- **अधिनियम-  महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ अ अन्वये महानगरपालिकेने पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल तयार करून ३१ जुलै पूर्वी सदर करणे आवश्यक आहे.**
- **संयुक्त राष्ट्र संघाच्या १७ शाश्वत विकास ध्येये** (Sustainable Development Goals) **यांना अनुसरून पुणे मनपाचे सध्याचे प्रकल्प व प्रस्तावित धोरणे, कार्यक्रम माहिती इत्यादी बाबतची माहिती या अहवालात देण्यात आली आहे.**
- **पुणे महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आलेला पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल २०२४-२५ हा महाराष्ट्र शासनाच्या 'माझी वसुंधरा अभियान'च्या पृथ्वी, वायू, जल, अग्नि आणि आकाश' या पंचतत्वांवर आधारीत आहे.**

## अ) पृथ्वी-

**पुणे शहरातील उद्यानांचा तपशील**

| सन | एकूण उद्याने | उद्यानांचे क्षेत्रफळ | वृक्षांची संख्या | शहराचे एकूण क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| २०२३-२४ | २११ | १९,७८,४४२.२२ चौ.मी | ५५,८१,५७८ | ५१९ चौ.किमी. |
| २०२४-२५ | २२४ | २४,९६,२६०.०५ चौ.मी. | ५७,८१,५७८ | ४८० चौ.किमी. |

**पुणे शहरातील पक्ष्यांची नोंद**

| सन | Ebird.org वेबसाईट नुसार पक्ष्यांची संख्या | | |
|---|---|---|---|
| | वेताळ टेकडी | कवडीपाठ | पाषाण |
| २०२३-२४ | २५३ | २६३ | २३६ |
| २०२४-२५ | २७५ | २६४ | २४० |

**पुणे शहरातील घनकचरा निर्मिती व प्रक्रिया**

| सन | प्रतिदिन एकूण | ओला कचरा | सुका कचरा |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | २१००-२२०० | ९५०-१००० | १२०० |
| २०२४-२५ | २३००-२४०० | ९५०-१००० | १३५०-१४०० |

- **शहरातील कार्यरत एकूण १३ प्रकल्पातून १४४० मे. टन सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते.**
- **शहरातील कार्यरत एकूण ६ प्रकल्पातून ११०५ मे. टन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते.**
- **बायोमायनिंग प्रकल्प- सन २०२१-२२ मध्ये फेज १ अंतर्गत ११.७६ लाख टन व फेज २ मध्ये सन २०२३ मध्ये ८ लाख मे. टन असे एकूण १९.७६ लाख मे. टन बायोमायनिंग करून २८.५ एकर जागा रिकामी करण्यात आली. तसेच २०२४-२५ मध्ये फेज ३ अंतर्गत १० लाख मे. टन च्या कामाला सुरुवात झाली आहे.**
- **त्याचप्रमाणे** GFC **अंतर्गत ५ स्टार मानांकनाने गौरविण्यात आले.**

## ब) वायू

### पुणे शहरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI PM10):-

| AQI Category (Range) | $PM_{10}$ 24-hr |
|---|---|
| Good (0-50) | 0-50 |
| Satisfactory (51-100) | 51-100 |
| Moderate (101-200) | 101-250 |
| Poor (201-300) | 251-350 |
| Very poor (301-400) | 351-430 |
| Severe (401-500) | 430 + |

| सन | हवेची गुणवत्ता निर्देशांक (AQI PM10):- (वर्षातील ३६५ दिवसांपैकी) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | उत्तम दिवस | समाधानकारक दिवस | मध्यम दिवस | खराब दिवस | अतिखराब दिवस |
| २०२३-२४ | ७९ | १४५ | १४० | १ | ० |
| २०२४-२५ | ५२ | १३७ | १७४ | ३ | ० |

### RTO पुणे यांच्या वेबसाईटवरील माहितीनुसार वाहनांचा तपशील

| सन | एकूण वाहनांची संख्या | वाहनांचा प्रकार | | |
|---|---|---|---|---|
| | | इलेक्ट्रिक | सी.एन.जी. | हायब्रीड |
| २०२३-२४ | ३८,६३,८४९ | ३४,९८४ | ४१,४९५ | ५,४०० |
| २०२४-२५ (जुलै २०२५ पर्यंत) | ४१,२५,९६८ (जुलै २०२५ पर्यंत) | ३३,३८७ (जुलै २०२५ पर्यंत) | ४३,५३३ (जुलै २०२५ पर्यंत) | ५,७८१ (जुलै २०२५ पर्यंत) |

PMPML च्या बसेसचा तपशील

| सन | पी.एम.पी.एम.एल. बसेसची एकूण संख्या | वाहनांचा प्रकार (पी.एम.पी.एम.एल.) | | (इलेक्ट्रिक + CNG) एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | इलेक्ट्रिक | सी.एन.जी. | |
| २०२३-२४ | १८८७ | ४७३ | ११८७ | ८८% |
| २०२४-२५ | १९६१ | ४९० | १२४४ | ८८% |

**४९० इलेक्ट्रिक बसेसचा एकूण प्रवास ५ कोटी किमी पेक्षा जास्त झाला आहे व यातून ७००० टन कार्बन उत्सर्जनात घट झाली आहे.**

## क) जल

**पाण्याची गुणवत्ता (नदी, तलाव)**

| सन | मुठा नदी (पाण्याची गुणवत्ता) | | |
|---|---|---|---|
| | डी.ओ. (mg/l) | सी.ओ.डी. (mg/l) | बी.ओ.डी. (mg/l) |
| २०२३-२४ | ३.७८ | ८६.२२ | २७.६७ |
| २०२४-२५ | ५.३४ | ९५.२७ | २७.७१ |

| सन | तलाव (पाण्याची गुणवत्ता) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | डी.ओ. (mg/l) | | सी.ओ.डी. (mg/l) | | बी.ओ.डी. (mg/l) | |
| | पाषाण | कात्रज | पाषाण | कात्रज | पाषाण | कात्रज |
| २०२३-२४ | ३.८९ | ३.९८ | ३३.२५ | १०.२० | १०३.८१ | ३३.९४ |
| २०२४-२५ | ५.२५ | ५.६६ | ३२.६७ | १०.३० | ११५.०७ | ३१.१४ |

## ड) अग्नी

**एकूण विजेचा वापर (kW)**

| सन | एकूण विजेचा वापर (kW) | सर्वात अधिक रहिवासी क्षेत्रातील विजेचा वापर (kW) |
|---|---|---|
| २०२४-२५ | ७२,९९,८८८ | ५४,४४,८४७ |

**सौरऊर्जा वापर**

| सन | अपारंपरिक विजेचा वापर (kW) |
|---|---|
| २०२३-२४ | ७९,६१८ |
| २०२४-२५ | १,६६,५१३ |

- **सन २०२२-२३ मध्ये पुणे शहरामध्ये इमारतींच्या छतावरील बसविण्यात आलेली सौर उर्जा क्षमता ७९,६१८** kW **होती. मागील दोन वर्षाच्या तुलनेत सौर ऊर्जेच्या क्षमतेमध्ये दुप्पट वाढ झाली असून सन २०२४-२५ मध्ये ती १,६६,५१३** kW **इतकी झाली आहे.**
- **मागील एका वर्षात ५०,०९७** kW **सोलर पॅनल बसविले गेले. सौरऊर्जेमध्ये सर्वात मोठा अंदाजे ६१**% **वाटा हा रहिवासी इमारतींचा आहे.**

**LED स्मार्ट स्ट्रीट लायटिंगचा वापर**

| सन | LED स्मार्ट स्ट्रीट लायटिंग | वीज बचत |
|---|---|---|
| २०२३-२४ | १,९३,३६४ | ५०% |
| २०२४-२५ | २,१३,७७० | ५६% |

**स्मशानभूमीत विविध दाहीन्यांच्या वापराची वार्षिक सरासरी टक्केवारी**

| सन | विद्युत दाहिनी | गॅस दाहिनी | लाकूड वावापर (APC system) |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | ३६% | २०% | ४४% |
| २०२४-२५ | ३३% | २३% | ४४% |

**ग्रीन हाऊस गॅस इमारती (GHG)**

| सन | एकूण शहराचे उत्सर्जन | प्रतिव्यक्ती कार्बन उत्सर्जन |
|---|---|---|
| २०२१-२२ | १,०२,७०,०७७ t $CO_2$ | २.४७ t $CO_2$ |

- (GHG) **चा प्रमुख स्त्रोत** Stationary Energy **६५**% **वाहनांमार्फत २९**% **कचऱ्यापासून ६**%

| सन | वॉटर हिटर वापरकर्ते |
|---|---|
| २०२३-२४ | ७२८२१ |
| २०२४-२५ | ९५७०७ |

## इ) आकाश

| सन | पावसाची नोंद (mm) | जास्त तापमान ($^0$C) | कमी तापमान ($^0$C) |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | ५६३.७० | ४१ | ७.४ |
| २०२४-२५ | १३११ | ४१.८ | ७.८ |

- **भूजल मॅपिंग नकाशानुसार ५० ॲक्विफर** (Aquifer) **हे मोकळ्या व ॲमिनीटी स्पेस मध्ये असून २५० ॲक्विफर हे** Partially **मोकळ्या ॲमिनीटी स्पेस मध्ये येत आहेत**. NDMA **च्या** Urban Flood Risk Management Programme **अंतर्गत या ॲक्विफर चा** recharge zone **विकसित केल्यानंतर शहरातील पूर नियंत्रण होणेस मदत होईल**.

**आरोग्य**

| सन | डेंग्यू | मलेरिया | चिकुनगुनिया | COVID-१९ | GBS |
|---|---|---|---|---|---|
| २०२३-२४ | ३३७७ | ११ | ४० | ३२३५ | १९८ |
| २०२४-२५ | ४९५८ | ० | ४८५ | ५६६ | २०५ |

- **सन २०१८ च्या गणणे नंतर भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया- ८५,१३३**
- **कुत्र्यांचा जन्मदर सन २०१८ च्या तुलनेत ४२.८७ ने कमी झाला आहे**

**मा.प्रशासक :** ओला–सुका कचरा वर्गिकरण व त्याचेवर होणारी प्रक्रिया याचे योग्य मुल्यमापन (Analysis) करुन घनकचरा विभागाने आकडेवारी अद्ययावत करावी. पारंपारिक व अपारंपारिक उर्जा स्त्रोतांबाबत इतर शहरांनी राबविलेल्या योजनांचा अभ्यास करण्यात यावा. घनकचरा व्यवस्थापन विभागाने अन्य शहरांमध्ये कचऱ्यापासून तयार केलेल्या उद्यानांची माहिती घेऊन, आपल्याकडे त्याचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी प्रत्यक्ष त्या शहरांना भेटी देऊन पाहणी करावी. तसेच अहवालात दिलेल्या आकडेवारींची सर्व विभागांनी पडताळणी करावी. पुणे मनपामार्फत राबविण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रियेमधून करण्यात येणाऱ्या कामांमध्ये शास्वत विकास ध्येय (Sustainable Development Goals-SDG) किती साध्य होत आहेत, याचे देखील नोंद घेण्यात यावी.

**ठराव क्रमांक : १६१**

**संदर्भ :– मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पर्यावरण/३६९, दि. २३/७/२०२५ चे पत्र.**

---

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ मधील कलम ६७ (अ) अन्वये पुणे शहराचा सन २०२४–२०२५ चा पर्यावरण सद्यःस्थिती दर्शक अहवाल सादर करणेत आल्याची नोंद घेण्यात येत आहे.**

**निर्णय : सदर विषय संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपल्याचे मा.प्रशासक यांनी जाहिर केले.

**सही/–xxx**
**श्रीमती योगिता भोसले,**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

***********

**दिनांक २०–०८–२०२५ च्या सभेत वृत्तांत कायम केला.**

**सही/–xxx**
**प्रशासक, पुणे मनपा, पुणे.**

***********